**संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ**
**(नॅकद्वारा 'अ' मानांकन प्राप्त)**

**जनसंपर्क विभाग**

---

**विद्यापीठ आजीवन अध्ययन व विस्तार विभागाच्यावतीने राष्ट्रीय योग कार्यशाळेचे आयोजन**

अमरावती -

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ आजीवन अध्ययन व विस्तार विभाग पदव्युत्तर पदवीका योग थेरपी अभ्यासक्रमाद्वारे योगचिकित्सा "मानवी आरोग्य आणि स्वच्छतेसाठी योगीक वारसा योगचिकित्सा" कार्यशाळेचे ऑनलाईन पद्धतीने दिनांक २५ जुलै ते २८ जुलै २०२० दरम्यान आयोजन करण्यात आले आहे. 'कोवीड-१९' या रोगाच्या प्रादुर्भावामुळे असाधारण परिस्थिती तसेच दिवसेंदिवस वाढत जाणाऱ्या तणावपूर्ण स्थितीत शारीरिक व मानसिक स्वास्थ्यावर अत्यंत नकारात्मक प्रभाव पडत आहे. कठीण प्रसंगी शरीर व मन संतुलीत ठेवुन आलेल्या आव्हानांना समोरे जाण्याचे धैर्य निर्माण व्हावे, त्याचबरोबर कोरोना सारख्या संसर्गजन्य रोगाविरूद्ध प्रतीकारक शक्ती निर्माण व्हावी, घराघरामध्ये योग चिकीत्सेबाबत जागृती निर्माण व्हावी व या माध्यमातून घरोघरी नैसर्गिकरीत्या उपचार व्हावे, या हेतुने सदर कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे.

या कार्यशाळेकरीता विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मुरलीधर चांदेकर अध्यक्षस्थान भूषविणार असून उद्घाटक म्हणून जगप्रसिद्ध योगगुरू पद्मश्री डॉ.ह.र. नागेंद्रजी, कुलगुरू, स्वामी विवेकानंद योग अनुसंधान संस्थान विश्वविद्यालय बंगलोर, यांचे प्रमुख मार्गदर्शन लाभणार आहे. तसेच या चार दिवसीय कार्यशाळेमध्ये अनेक राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय तज्ञ मार्गदर्शकांचा लाभ मिळणार आहे. कार्यशाळा पूर्णपणे निःशुल्क असुन या कार्यशाळेकरीता https://sites.google.com/view/sgbau-dlleyoga/home यावर कार्यशाळेची नोंदणी करावयाची असून टेलिग्राम जॉईन करण्यासाठी https://t.me/joinchat/sdVI6E9E7m4fXhqM88agA ही लिंक दिलेली आहे. तरी कार्यशाळेचा जास्तीतजास्त लाभ शिक्षक, विद्यार्थी व नागरिकांनी घ्यावा, असे आवाहन कुलसचिव डॉ. तुषार देशमुख व विभागाचे संचालक डॉ. श्रीकांत पाटील यांनी केले आहे.

---

प्रति,
मा. संपादक/जिल्हा प्रतिनिधी
दै.............................. अमरावती.

**जनसंपर्क विभाग**
दि. २२/०७/२०२०.

मा. महोदय,

आपणांस विनंती करण्यात येते की, सोबतच्या वृत्तास आपल्या लोकप्रिय वृत्तपत्रातून कृपया प्रसिद्धी द्यावी, ही विनंती.

आपला,

**(डॉ. विलास नांदुरकर)**
जनसंपर्क अधिकारी